

नाव : रविन्द्र मुरलीधर धामंदे
गाव : बोरगाव गोंडी, ता. कारंजा, जि. वर्धा
वय : ४२ वर्षे
जात : कलार (ओ. बी. सी)
व्यवसाय : शेती (५ एकर)
कुटूंब संख्या : ६ (४ मोठे, २ मुले)


Written by **Manoj R. Sayre,**
Senior Technical Assistant,
FSN study under LANSA.


LANSA
Leveraging Agriculture for Nutrition in South Asia

MSSRF
Science for Sustainable Development

# जॅकी-६२१८ : मर रोग प्रतिबंधीत सुधारीत चण्याचे वाण

मी एक अल्प भूधारक शेतकरी असून कुटूंबाच्या पोषणाची जबाबदारी शेतीवरच आहे. पूर्वी मी माझ्या शेतात चना या पिकाचे विजय हे वाण लावायचो परंतु त्याला बिज प्रक्रिया न केल्यामुळे त्यावर मर रोग जास्त प्रमाणात यायचा व उत्पादनात देखील घट यायची त्यामुळे अपेक्षित उत्पादन मिळत नसे.

एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन अंतर्गत पोषणांवर आधारित पिक पद्धती हा प्रकल्पातून मला जॅकी-६२१८या वाणाचे चना चे बियाणे १ एकर करिता २० किलो बियाणे मला वर्ष २०१५-१६ मध्ये मिळाले होते. परंतु जॅकी-६२१८ हे चना पिकांचे वाण पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला द्वारे मान्यता प्राप्त असून मर रोगास प्रतिबंधक असे हे वाण आहे. आता दरवर्षी मी बियाणे पेरतेवेळेस बीज प्रक्रिया करूनच लागवड करीत असतो. सुरूवातीला मी जमिनीची चांगली खोलगट नांगरणी ट्रॅक्टर द्वारे करून घेतली, मशागतीच्या दोन पाळया वखराच्या दिल्या. त्यानंतर ओलित करून नंतर पेरणी करण्यात आली. पेरणीआधी बिजप्रक्रिया करून घेतली. फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली बियाण्यांची पेरणी करून घेतली. या करिता चांगले मार्गदर्शन मला फाउंडेशनचे मिळाले. जॅकी-६२१८ हे पिक ६३-१२५ दिवसांचे आहे, मर रोगास प्रतिबंधक असे वान आहे. दाण्याचा आकार भरीव व मोठा आहे. एकरी १० क्विंटल उत्पादन मला वर्ष २०१६-१७ मध्ये मिळाले. तेव्हापासून मी सतत याच बियाण्याचा वापर करित आहे.

चना या पिकांवरील रोग व किडीच्या नियंत्रासाठी फाउंडेशननी दिलेल्या बिव्हेरिया बॅसीना या जैविक औषधांचा वापर मी केला. या आधी पिकांवर निंबोळी अर्क व गोमुत्रांची फवारणी मी केली. आठ-आठ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यामुळे अळीचा प्रादुर्भाव कमी झाला. तसेच अळीच्या नियंत्रणासाठी फेरोमेन ट्रॅपचा वापर केला. यामुळे माझा खर्च निम्यांनी वाचला. पूर्वी मी रासायनिक फवारणी फार जास्त करायचो त्यामुळे खर्च अधिक होत होता. परंतु फेरोमेन ट्रॅप्स, निंबोळी व गोमुत्राचा अर्क व बिव्हेरिया बॅसीना या जैविक औषधीमुळे खर्चात खूप बचत झाली व त्याचे महत्व देखील कळले.

चना या पिकाला मागील वर्षी चांगला भाव मिळाला. वर्ष २०१६-१७ मध्ये चना या पिकापासून मला एकरी २०००० ते २५००० रू. मला निव्वळ नफा मिळाला. सोबतच घरी खाण्यास वर्षभर दाळ उपलब्ध झाली. मागील तीन वर्षापासून हे बियाण्यांचे संवर्धन मी करीत असतो. याकरीता बियाण्यांचे जतन व्हावे व पुढील वर्षी बियाणे पेरणीकरीता चांगले राहावे याकरिता फाउंडेशन द्वारा ट्रिपल लेअर धान्य स्टोअरेज बॅग आम्हाला मिळाली. याचा फायदा धान्याला रोग व किडीपासून बचाव झाला. बियाण्यांवर दरवर्षी होणारा खर्च वाचला, उत्पन्न वाढले. रासायनिक औषधींचा वापर कमी झाला. त्यामुळे उत्पन्नात वाढ झाली. घरच्या आहारात दाळीचे प्रमाण वाढून प्रथिनांची समस्या कमी होण्यास मदत झाली. या प्रकल्पामुळे मी समाधानी असून संतुलीत पोषण विषयक माहिती मिळाली.

